दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

▶ वर्ष–३

■ अंक–३०

दहा वर्षांपासून पाण्याच्या प्रतिक्षेत असलेल्या दिव्यातील साठवण टाक्या



# या रंगवलेल्या टाक्या फार सुंदर दिसतात

# पण तुम्हाला माहिती आहे, या दोन्ही साठवण टाक्यात मागील दहा वर्षांपासून पाणी नाही!

दिवा न्यूज विशेष

दिवा : दिवा शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी बेतवडे येथे बांधण्यात आलेल्या या साठवण टाक्या मागील दहा वर्षांपासून बंद स्थितीत आहेत. साठवण टाकीत पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आणि नियोजन महापालिकेमार्फत त्यावेळी करण्यात आले नाही. परिणामी खर्च करूनही या साठवण टाक्यातून दिवा शहराला पाणीपुरवठा होऊ शकला नाही. दिवा शहरात पाणी समान दाबाने वितरित न होण्याला हेही एक कारण आहे.या साठवण टाक्यातून पाणीपुरवठा होऊ शकला असता तर कदाचित दिवा शहरातील अनेक भागात समप्रमाणात आणि समान दाबात पाणीपुरवठा झाला असता. या टाक्यांना निळ्या रंगात रंगरंगोटी करण्यात आली आहे, पण दुर्दैवाने यात मागील दहा वर्षांपासून पाणी नाही हे वास्तव आहे.

आता महापालिका नव्या री–मॉडेलिंग पाणी योजनेच्या अंतर्गत या साठवण टाकीतून पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयत्न करत आहे.तसा प्रस्ताव असल्याचे आता महापालिका पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी श्री वाघिरे यांनी दिवा न्यूज सोबत बोलताना सांगितले.

यासाठी आगासन फाटक ते टाकीपर्यंत नव्याने ५०० मि.मिची नवीन लाईन टाकण्यात येणार असल्याचे श्री वाघेरे म्हणाले.

या टाकीतून पाणीपुरवठा होऊ लागल्यास दिवा शहरातील मोठ्या भागाला पाणीटंचाईपासून दिलासा मिळेल.


दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २६ फेब्रुवारी २०२४
पान : २
www.diwanews.com

# रस्त्यावरती सांडलेल्या ऑईलवरून तीन दुचाकी घसरून चौघे जखमी




**ठाणे:** रस्त्यावर सांडलेल्या ऑइलवरून घसरून तीन दुचाकीवरील चार जण जखमी झाल्याची घटना शनिवारी सकाळी ठाण्याच्या घोडबंदर रोडवरील मानपाडा ब्रिजवरती घडली . त्या सांडलेल्या ऑइलवर माती पसरवून तो रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आल्याची माहिती ठाणे म हानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिले.

सकाळी मानपाडा ब्रिज वरती अज्ञात वाहनांमधून ऑइल सांडले होते. याच दरम्यान तेथून जाताना त्या ऑइलवरून सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास तीन दुचाकी घसरल्याच्या घटना समोर आल्या. या घटनांमध्ये सागर म्हापदी (३२), अब्रार सय्यद (२५),रोहित पाटील (३४) आणि सलमान शेख (२४) हे चौघे जखमी झाले असून सागर यांच्या डाव्या पायाला किरकोळ दुखापत तर सय्यद याच्या पायाला मुकामार लागला आहे. याशिवाय रोहित याच्या कमरेला किरकोळ तर सलमान याच्या डाव्या पायाला व कमरेला गंभीर दुखापत झाली आहे.त्यांना स्थानिकांनी उपचारार्थ मानपाडा येथील खाजगी हॉस्पिटल येथे दाखल केले.या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळ शहर वाहतूक विभाग, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तर घटनास्थळी रोडवरती सांडलेल्या ऑईलवरती तातडीने माती पसरविण्यात आली असून, तो रोड वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला आहे. तसेच त्या तिन्ही दुचाकींचे नुकसान झाले आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.



# राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयाचा एमबीबीएसचा विद्यार्थी आकिफ रेशमवाला याला सुवर्णपदक

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयाचा एमबीबीएसचा विद्यार्थी आकिफ रेशमवाला याने राज्य स्तरावर प्रथम येत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातून सुवर्ण पदक मिळविले आहे. आकिफला जनरल मेडिसीन या विषयात सुवर्ण पदक मिळाले आहे. तो महाविद्यालयातही प्रथम आला असून प्रसूती व स्त्रीरोग आणि बाल रोग या विषयात त्याला विशेष प्राविण्य मिळाले आहे. आकिफ रेशमवाला याला महाविद्यालयातील पहिल्या वर्षापासून विशेष प्राविण्य मिळाले आहे. पहिल्या आणि दुसऱ्या वर्षी त्याला महाविद्यालयीन स्तरावरील सुवर्ण पदक मिळाले होते. एमबीबीएसच्या पहिल्या वर्षी तो राज्यातून पाचवा आला होता. चारही वर्षात त्याने अव्वल शैक्षणिक कामगिरी केली आहे. एमबीबीएसच्या चौथ्या वर्षी त्याला ७५.७८ टक्के गुण मिळाले आहेत.



आकिफ मुळचा मुंबईचा असून आता त्याने नीट-पीजी या प्रवेश परिक्षेच्या तयारीवर लक्ष केंद्रीत केले आहे. जनरल मेडिसीन या विषयातील सुवर्ण पदक मिळाल्याने खूप आनंद झाला, परिश्रमाचे चीज झाले, अशी प्रतिक्रिया आकिफने व्यक्त केली आहे. तसेच, राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय आणि छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे मला खूप शिकायला मिळाले. शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाचा अभ्यासात पदोपदी उपयोग झाला. त्यामुळेच मी जनरल मेडिसीन या विषयात सर्वोत्कृष्ट काम गिरी करू शकलो आणि महाविद्यालयाचा गौरव वाढवू शकलो, असेही आकिफने सांगितले.

नियमित केलेला अभ्यास, रुग्णालयात वरिष्ठ डॉक्टरांसोबत काम करताना मिळणारा अनुभव याचा फायदा झाल्याचेही आकिफ याने सांगितले.

आकिफ हा अतिशय हुशार आणि मेहनती विद्यार्थी आहे. त्याने पहिल्या वर्षापासून शैक्षणिक कामगिरीत सातत्य ठेवले आहे. त्याशिवाय, त्याने विद्यार्थी परिषदेच्या २०२१-२२ या वर्षात शैक्षणिक सचिव आणि संशोधन प्रमुख म्हणूनही काम केले आहे. वेगवेगळ्या प्रश्नमंजुषा स्पर्धेतही त्याने यशस्वी सहभाग घेतला आहे. त्याचा या यशामुळे आम्ही सगळे समाधानी आहोत, असे प्रतिपादन राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. राकेश बारोट यांनी केले.

# जरांगे पाटील यांची ओबीसी मधून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी योग्य आणि संविधानिक – माजी खासदार हरिभाऊ राठोड

**ठाणे –** मराठा नेते मनोज जरांगे पाटील हे वारंवार पोट तिडकीने सरकारकडे मागणी करीत आहे की, ओबीसी मधूनच आम्हाला आरक्षण द्या, त्यांची ही मागणी योग्य आणि संविधानिक आहे. तर राज्य सरकारला फक्त ओबीसीमधून तर केंद्र सरकारला एससी, एसटी आणि ईडब्ल्यूएस व्यतिरिक्त अन्य पर्यायातून आरक्षण देता येत नसल्याने सध्या दिलेले आरक्षण हे असंविधानिक आहे, असा दावा ज्येष्ठ संविधान अभ्यासक तथा ओबीसी नेते मा. खा.हरिभाऊ राठोड यांनी पत्रकार परिषदेत केला.

मा.खा. राठोड म्हणाले की, बाळासाहेब आंबेडकर हे सांगतात ''मराठ्यांचे ताट ''वेगळे तर ओबीसींचे ताट वेगळे ''. वेग - वेगळे ताट करणे, याचा अर्थ भारतरत्न कर्पूरी ठाकूर फार्मूला वापरून, कुणबी मराठा एकत्र करून वेग -वेगळ्या ताटात आरक्षण दिले, तर सर्वच मागासवर्गीय प्रवर्गाला आरक्षणाचा लाभ होईल . मनोज जरांगे पाटील यांची ओबीसी मधून मराठा सम ाजाला आरक्षण देण्याची मागणी कायदेशीर आणि संविधानिक असल्यामुळे आमचा त्यांच्या आंदोलनास पाठिंबा असल्याचे ओबीसी नेते माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी सांगितले. तसेच दहा टक्के वेगळे आरक्षण देण्याचे सरकारने घेतलेला निर्णयाचा पुनश्चः विचार करावा,असा सल्ला देखील त्यांनी दिला.

दरम्यान, राज्य सरकारला अशा पद्धतीने स्वतंत्र आरक्षण देण्याचा अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी दिलेले आरक्षण हे असंविधानिक असून त्याचे पुनर्विलोकन करावे आणि ओबीसी आरक्षणाची २७ टक्क्यांची मर्यादा वाढवून मराठ्यांनाही ओबीसींमधून आरक्षण द्यावे. ते आरक्षण संविधानिक होईल आणि सर्वोच्च न्यायालयातही टिकेल, असा दावाही हरिभाऊ राठोड यांनी केला.



# अमृत भारत योजनेअंतर्गत होणाऱ्या दिवास्थानकाच्या विकासाबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचे आभार – सचिन भोईर



**दिवा : – अमृत भारत योजनेअंतर्गत दिवा रेल्वे स्थानकाचा होणारा विकास हा आमच्यासाठी अभिमानास्पद असून संपूर्ण दिवावासीयांच्या वतीने आम्ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो, असे वक्तव्य दिवा भाजपचे अध्यक्ष सचिन भोईर यांनी दिवा न्यूज सोबत बोलताना केले.**

अमृत भारत योजनेअंतर्गत देशातील विविध रेल्वे स्थानकांचा विकास केला जाणार आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ही महत्वकांक्षी योजना असून या योजनेमुळे देशातील अनेक रेल्वे स्थानकांचा विकास केला जाणार आहे.यामध्ये मध्य रेल्वेच्या दिवास्थानकाचाही विकास केला जाणार असल्याने ही दिवावासीयांसाठी आनंदाची बाब असल्याचे सचिन भोईर यांनी म्हटले आहे. सचिन भोईर यांनी याबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले असून दिवा रेल्वे स्थानकाच्या विकासाचा लाभ येथील जनतेला होईल असा विश्वास भोईर यांनी व्यक्त केला आहे.दिवा रेल्वे स्थानकात याआधी अनेक समस्या होत्या मात्र मागील दहा वर्षात केंद्र सरकारच्या माध्यमातून मोदी सरकारने भरघोस निधी उपलब्ध करून दिल्याने अनेक सुविधा दिवा रेल्वे स्थानकात उपलब्ध झाल्या. दिवास्थानकात आज ज्या सुविधा आहेत या भारतीय जनता पार्टीच्या केंद्र सरकारच्या माध्यमातून झाल्या असल्याचे सचिन भोईर यांनी म्हटले आहे. अमृतभारत योजनेअंतर्गत दिवास्थानकाचा विकास हा त्याचाच भाग असून भाजपचे केंद्रातील सरकार दिवास्थानकाकडे विशेष लक्ष ठेवून असल्याचे सचिन भोईर यांनी म्हटले आहे. दिवास्थानकाच्या होणाऱ्या विकासा बद्दल सचिन भोईर यांनी देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री आणि रेल्वे राज्यमंत्री यांचे आभार मानले आहेत.

**दिवा रेल्वे स्थानक प्रकल्प खर्च ४५.०९ कोटी**

**कामाचे स्वरूप**

- मुंबई सीएसएमटी शेवटी १२ मीटर रुंद फूट ओव्हर ब्रिजची तरतूद
- पूर्वेकडील नवीन बुकिंग कार्यालय
- प्रदक्षिणा क्षेत्रात आरसीसी कंपाउंड वॉलची तरतूद, अप्रोच रोडची सुधारणा
- प्लॅटफॉर्म सर्फेसिंगची दुरुस्ती, कव्हर ओव्हर प्लॅटफॉर्म कॉलम्सवर नवीन एसीपी क्लेडिंग
- परिभ्रमण क्षेत्रात क्लस्टर वृक्षारोपण, विद्यमान वेटिंग हॉल आणि शौचालयाचे नूतनीकरण

# अखेर क्लस्टरमधून ठाण्यातील १६ एसआरए योजना वगळल्या

## हजारो झोपडीधारकांना हक्काची घरे मिळण्याचा मार्ग मोकळा



### आमदार संजय केळकर यांचे मानले आभार

**ठाणे:** ठाणे महापालिकेच्या हद्दीत सुरू असलेल्या १६ झोपडपट्टी पुनर्विकास योजना क्लस्टर मध्ये समाविष्ट करण्यात आल्याने या योजना रखडल्या होत्या. आमदार संजय केळकर यांच्या चौफेर पाठपुराव्यानंतर या योजना क्लस्टरमधून वगळण्याचा अध्यादेश राज्य सरकारने काढला आहे. त्यामुळे हजारो गरीब कुटुंबांचा हक्काची घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ठाणे शहरात गेल्या काही वर्षांपासून झोपडपट्टी पुनर्विकास योजनांची प्रक्रिया सुरू होती. अनेक योजना अंतिम टप्प्यात होत्या. शेकडो कुटुंबे भाड्याच्या घरात राहत होती. अशावेळी राज्यात जनहिताची क्लस्टर योजना सुरू करण्यात आली. ठाण्यात क्लस्टरचे ४४ आराखडे तयार करण्यात आले. यातील किसननगर क्लस्टरचे काम सुरू झाले असले तरी इतर ठिकाणी अद्याप काम सुरू झालेले नाही. या योजनेत एस आर ए योजना सुरू असलेल्या झोपडपट्ट्यांचा देखील समावेश करण्यात आल्याने क्लस्टरसह या झोपडपट्ट्यांचा विकासही रखडला. एसआरए योजना ठप्प झाल्याने हजारो कुटुंबे हवालदिल झाली होती.

एस आर ए योजना सुरू असलेल्या ठाण्यातील अशा नियोजित १६ सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार संजय केळकर यांची भेट घेऊन व्यथा मांडली. गेल्या दोन वर्षांपासून श्री.केळकर यांनी एसआरए प्राधिकरण अधिकाऱ्यांशी चर्चा, अधिवेशनात चर्चा आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा असा चौफेर पाठपुरावा केला. अखेर या प्रयत्नांना यश आले असून काल राज्य शासनाने अध्यादेश काढून सन २०२२ पर्यंत सुरू असलेल्या एसआरए योजनांना क्लस्टरमधून वगळण्यात आले.

या निर्णयाबाबत आमदार संजय केळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. तसेच पुढील काळात सन २०२२ नंतर सुरू झालेल्या उर्वरित काही योजनांनाही वगळण्याची मागणी करणार असल्याचे केळकर यांनी सांगितले.

याआधी क्लस्टरमध्ये अधिकृत गृह संकुलांचाही समावेश करण्यात आला होता. या सोसायट्यांनी देखील पुनर्विकास प्रक्रिया सुरू केली होती. येथील रहिवाशांनी साकडे घातल्यानंतर आमदार केळकर यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू केला होता. या प्रयत्नांनी यश येऊन शासनाने क्लस्टरमधून अधिकृत गृहसंकुले वगळली.

**या १६ ठिकाणी एसआरए योजना**

नव साई चैतन्य–बी केबिन नौपाडा, महाराष्ट्र दर्शन–शेलारपाडा, विष्णू–मंजुळा ठाणेकर, पवनपुत्र–सिद्धार्थ नगर कोपरी, दत्तकृपा–कोपरी कॉलनी, श्री जय अंबे –करवालो नगर, शिव औदुंबर–लोकमान्य नगर, फर्नांडिस हाऊस–धोबी आळी, श्री साई दर्शन–नुरीबाबा दर्गा मार्ग, सिद्धी विनायक–वीर सावरकर नगर, श्री स्वामी एकता रहिवासी–चराई, मार्क्स नगर–राबोडी आदी १६ ठिकाणी एसआरए योजनांची प्रक्रिया सुरू होती.



# मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात सर्वंकष स्वच्छता मोहिमेत झाली रस्ते आणि नालेसफाई

# ठाणे महापालिकेची सर्वंकष स्वच्छता मोहीम





**ठाणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेनुसार ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या सर्वंकष स्वच्छता मोहिमेत मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात साफसफाई करण्यात आली. मुंब्रा अग्निशमन केंद्र येथून या सफाई मोहिमेस आरंभ झाला. या मोहिमेत मुख्य रस्ते, पदपथ, अंतर्गत रस्ते, नाले यांची सफाई करण्यात आली. तसेच, अग्निशमन केंद्रासमोरील रस्ते दुभाजकांमध्ये वृक्षारोपणही करण्यात आले.

महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या या मोहिमेत रस्ते साफ करणे, पाण्याने धुणे, पदपथ सफाई, रस्ते दुभाजक स्वच्छ करणे, नाले सफाई, उद्यान सफाई यांचा समावेश आहे. या मोहिम अंतर्गत शनिवारी मुंब्रा प्रभाग समिती कार्यक्षेत्रात आयोजित केलेल्या सर्वंकष स्वच्छता अभियानास स्थानिक नागरिकांही प्रतिसाद दिला.

या मोहिमेत सफाई कर्मचा-यांसोबत महापालिकेचे अतिरीक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त तुषार पवार, उपनगर अभियंता कार्यशाळा गुणवंत झांबरे, वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे तसेच महापालिका अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

सकाळी ६.१५ वाजता मुंब्रा अग्निशमन केंद्र येथे या मोहिमेस आरंभ झाला. मुंब्रा प्रभागातील आत्माराम चौक, रेती बंदर, दत्तवाडी. मुंब्रा स्टेशन परिसर, मुंब्रा मार्केट, मुंब्रा बायपास, न्यू मित्तल रोड, स्टेडियम रोड, गुलाब पार्क मार्केट परिसर, किस्मत कॉलनी परिसर, कादर पॅलेस वसाहत, ठाकूरपाडा, संजय नगर, आनंद कोळीवाडा, बाबाजी पाटील वाडी, शंकर मंदिर परिसर, अमृतनगर वसाहत येथील मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते यांची साफसफाई करण्यात आली. मुख्य रस्ते, पदपथ झाडून पाण्याने स्वच्छ करण्यात आले. रस्त्यावरील दुभाजक स्क्रबरच्या साहाय्याने घासून नंतर पाण्याच्या फवारणीने स्वच्छ धुण्यात आले. परिसरातील रस्त्यांबरोबरच लहान-मोठे नालेही स्वच्छ करण्यास सुरूवात झाली.

या स्वच्छता मोहिमेस आरंभ झाल्यानंतर, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांच्या हस्ते अग्निशमन केंद्रासमोरील रस्ते दुभाजक सुशोभीत करण्यासाठी तेथे वृक्षारोपण करण्यात आले. रस्ते, पदपथ सफाईसोबतच धूर फवारणी, औषध फवारणीही करण्यात आली.

# ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार-२०२३ प्रदान

## अष्टपैलू अशोक सराफ हे मराठी मातीतील अस्सल हिरा - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई :** आपल्या अविस्मरणीय भूमिकांनी अष्टपैलू अभिनेते अशोक सराफ यांनी प्रेक्षकांची अभिरुची संपन्न केली. अवघ्या महाराष्ट्राला त्यांनी पोट धरून हसवले. प्रसिद्धीचे इतके वलय मिळूनही त्यांनी कधीही जमीनीशी नातं तोडलं नाही. खऱ्या अर्थाने ते मराठी मातीतील अस्सल हिरा आहेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या कार्याचा गौरव केला. मराठी चित्रपटसृष्टीसाठी जे जे आवश्यक आहे, त्या सर्व सुविधा राज्यात उपलब्ध करून देण्याचा आणि जगाला हेवा वाटेल अशी फिल्मसिटी आपण तयार करू, असे प्रतिपादन त्यांनी केले.

महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा ''महाराष्ट्र भूषण'' पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना तर मानाचा ''गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार'' ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री शिंदे बोलत होते. याशिवाय, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून अनेक वर्ष योगदान देत रसिकांची व



कलासृष्टीची सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा राजकपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात आले. या समारंभास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार मनीषा कायंदे, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे आदींची उपस्थिती होती.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २६ फेब्रुवारी २०२४
पान : ५
www.diwanews.com



सहयोग अपार्टमेंट, साबे रोड,दिवा पूर्व येथील सत्यनारायणाच्या पूजेला माजी नगरसेवक व शिवसेना उपशहर प्रमुख शैलेश पाटील यांनी उपस्थिती लावत दर्शन घेतले. यावेळी सोबत त्यांचे कार्यकर्ते देखील उपस्थित होते.



श्री गणेश प्लाझा बिल्डिंग येथे आयोजित सत्यनारायणाची महापूजा व हळदी कुंकू समारंभाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी उपस्थित राहून म हापूजेचे दर्शन घेतले व हळदी कुंकू समारंभात सहभागी झाल्या. यावेळी आयोजक महिलांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## टीएमटी बसचा अपघात, कुणीही जखमी नाही

**ठाणे:** घोडबंदर रोडकडून ठाण्याकडे निघालेल्या ठाणे महापालिका परिवहन सेवेची बसने मागून उभा असलेल्या टँकरला जाऊन ठोकर दिल्याची घटना नुकतीच घोडबंदर रोडवरील वाघबीळ येथे घडली. या घटनेत कोणीही जखमी झाले नसून हा अपघात बसचा ब्रेक फेल झाला आहे. अशी माहिती ठाणे आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्याने दिली.

टीएमटी चालक सागर आपोटिकर हे शुक्रवारी सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास सहा प्रवासी घेऊन कासारवडवली येथून ठाणे स्टेशनला निघाले होते. याचदरम्यान बसचा ब्रेक फेल झाल्याने त्या बसने रस्त्याशेजारी उभ्या केलेल्या टँकरला मागून धडक दिली. या अपघातात बसच्या पुढील भागाचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच, शहर वाहतूक विभागाचे कर्मचाऱ्यांनी धाव घेतली. तसेच त्यांच्या मदतीने अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात आली. तसेच तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला आहे. तसेच त्या बसमधून एकूण सहा प्रवासी प्रवास करत होते. त्यांना कोणतीही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्याने दिली.

# ठाणे महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहिले क्षेपणास्त्र प्रक्षेपण

### ठाणे महापालिका आणि मराठी विज्ञान परिषद यांचा विज्ञानमंच उपक्रम



**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या शाळांमध्ये आठवी-नववी या इयत्तेतील ३६ विद्यार्थ्यांनी बुधवार, २१ फेब्रुवारी रोजी इस्रोच्या केरळ येथील तिरुवनंतपुरममधील विक्रम साराभाई अंतराळ केंद्राला भेट दिली. त्यांना तेथे आरएच-२०० या क्षेपणास्त्राचे प्रक्षेपण प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. ठाणे महापालिका आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या विज्ञानमंच या संयुक्त प्रकल्पात या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

मराठी विज्ञान परिषदेच्या ठाणे शाखेचे अध्यक्ष दा. कृ. सोमण यांनी विद्यार्थ्यांना क्षेपणास्त्र प्रक्षेपण, त्याची आवश्यकता, उपयोग यांची विस्तृत माहिती दिली. त्यानंतर, विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रक्षेपण पाहिले. सर्वसाधारणपणे दर महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी या अंतराळ केंद्रावरून हे प्रक्षेपण होते. त्यासाठी देशभरातील विद्यार्थी, अभ्यासक, शिक्षक उपस्थित होते. या प्रक्षेपणानंतर विद्यार्थ्यांनी इस्रोच्या संग्रहालयाला भेट दिली. संग्रहालयात रॉकेटमध्ये इस्रोने कशी प्रगती केली, प्रथम सायकलचा नंतर बैलगाडी यांचा रॉकेट वाहतुकीसाठी कसा उपयोग केला हे विद्यार्थ्यांना पाहता आले. भारताचा पहिला उपग्रह आर्यभट, भारताचे पहिले अंतराळवीर राकेश शर्मा, चांद्रयान-१, मंगळयान, चांद्रयान-२ , एकाच रॉकेटद्वारे १०४ उपग्रह, चांद्रयान-३ , आदित्ययान यांची मॉडेल्स दाखवून माहिती देण्यात आली. गगनयान मोहिमेचीही माहिती यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आली. प्रक्षेपण झाल्यावर विद्यार्थ्यांनी हम होंगे कामयाब आणि सारे जहासे अच्छा या समूह गीतांनी एकच जल्लोश केला. दिवसभराच्या या कार्यक्रम ात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. महापालिका शाळांतील आठवी- नववी या इयत्तेतील २२ मुले आणि १४ मुली असे ३६ विद्यार्थी आणि आठ शिक्षक या पाहणी दौऱ्यात सहभागी झाले आहेत. शनिवार, २४ फेब्रुवारी रोजी हे विद्यार्थी ठाण्यात परतणार आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्या आठवी आणि नववी इयत्तेतील विद्यार्थ्यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानाची गोडी लागावी, त्याविषयी कुतुहल असलेल्या विद्यार्थ्यांना अधिक माहिती मि ळावी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे यासाठी महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी पुढाकार घेऊन मराठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने विज्ञानमंच हा उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या सर्व शाळांमधील आठवी आणि नववी या इयत्तांमधील प्रत्येकी चार ते पाच विद्यार्थ्यांचा विज्ञानमंच स्थापन करण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ अणु शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी गेल्यावर्षी स्वातंत्र्यदिनी केले होते. विज्ञानमंच या उपक्रमात खगोल अभ्यासवर्ग उपक्रमांतर्गत सहभागी विद्यार्थ्यांची खगोल आणि भूगोल या विषयांची स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. त्यातून एकूण ७७ विद्यार्थी यंदाच्या वर्षी या पाहणी दौऱ्यांसाठी निवडण्यात आले आहेत. त्यातील ४१ विद्यार्थ्यांनी जानेवारी महिन्यात पुण्यालगत नारायणगाव येथील जायंट मीटरव्हेव रेडिओ टेलिस्कोप केंद्राला भेट दिली होती. तर, उर्वरित ३६ विद्यार्थ्यांनी इस्रोच्या विक्रम साराभाई अंतराळ केंद्राला भेट दिली.

# सुविधांच्या प्रकल्पात महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**ठाणे: सुविधांचे प्रकल्प करणारे महाराष्ट्र हे राज्य देशातील पहिले राज्य आहे. तसेच परदेशी गुंतवणुकीमध्ये देखील आपलं राज्य आपलं सरकार यायच्या अगोदर दोन–तीन नंबर ने मागे गेले होते. पण जसे आपले सरकार आल्यानंतर सहा महिन्यांमध्ये पुन्हा महाराष्ट्र हे राज्य परदेशी गुंतवणूकीत पुन्हा पहिल्या नंबरवर आपण आणले. त्यामुळे हे सर्वसामान्यांचे आपलं सरकार महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन आहे. असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी ठाण्यात पार पडलेल्या म्हाडा लॉटरी सोडती दरम्यान केले.**

याचदरम्यान पुढे बोलताना, मुख्यमंत्र्यांनी जगभरातल्या तिसऱ्या क्रमांकावर भारताची अर्थव्यवस्था आणण्याचा संकल्प आहे आणि आपलं महाराष्ट्र त्यामध्ये वन ट्रीलियन डॉलर हा गोल जो आहे अचिव केल्याशिवाय राहणार नाही. असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कोकण विभागातील विविध गृहनिर्माण प्रकल्प अंतर्गत ५ हजार ३११ सदनिका विक्रीची संगणकीय सोडत शनिवारी ठाण्याच्या राम गणेश गडकरी रंगायताना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काढण्यात आली. यावेळी गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे, माजी आमदार रवींद्र फाटक आणि भाजप ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना, मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हाडाच्या माध्यमातून आतापर्यंत नऊ लाख घरे दिल्याचे सांगून ही संख्या मोठी आहे. तसेच गिरणी कामगारांना ही घरे देण्यास सुरुवात केली आहे. मुंबई प्रमाणे ठाण्यातही गिरणी होती असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. ज्यांना या लॉटरीमध्ये घरी मि ळणार आहेत, त्यांचे अभिनंदन ज्यांना मि ळणार नाहीत, त्यांचे सुद्धा अभिनंदन त्यांना दुसऱ्या लॉटरीत घरी मिळतील आणि त्यांचे घर घेण्याचे स्वप्न पूर्ण होईल असेही यावेळी मुख्यमंत्री म्हणाले.

पंतप्रधान आवास योजना ही शहरी भागातच नाही तर ग्रामीण भागात ही सुरू आहे. त्यातच सोलापुरात ३० हजार घरांची लॉटरी काढण्यात आली. शिवाय म्हाडावरील लोकांचा विश्वास वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. लॉटरी करताना पारदर्शकता असल्याचे सांगून येथे कोणाच्याही शिफारशीला वाव नाही. आपले हे सर्वसाम न्यांचे सरकार असून दुजाभाव करणारे हे सरकार नाही म्हणून गेल्या दीड वर्षांमध्ये अनेक निर्णय आपल्या सरकारने घेतले. मग पायाभूत सुविधा असतील, त्यामध्ये अटल सेतू तसेच बाळासाहेब ठाकरे समृद्धी हायवे अशा प्रकारचे गेम चेंजर प्रकल्प तयार करून शकलो. आज ठाण्यामध्ये देखील आपण बायपास करतोय आपण उड्डाणपूल करतोय अगदी शहराच्या बाहेरच्या बाहेरून मार्ग आपण काढतोय. हे वाहतूक कोंडी दूर व्हावी यासाठी अनेक प्रकल्प आपण हाती घेतोय असेही ते म्हणाले. त्यामुळे पायाभूत सुविधांचे प्रकल्प करणार आहे आपले राज्य देशातला पहिले राज्य आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### वेळेमध्ये जी घर पूर्ण करतील त्यांना बक्षीस द्या

म्हाडाचे प्रकल्प वेळेमध्ये प्रकल्प पूर्ण झाले पाहिजे काही प्रकल्प एवढे रिंगाळतात की त्या प्रकल्पाची चव निघून जाते आणि मग ते प्रकल्प पुन्हा त्यांना दुरुस्ती करावी लागते असे प्रकरण मुंबईमध्ये अनेक पाहिले. परंतु म्हाडामध्ये आता आपले सरकार आल्यानंतर सर्व वस्तूस्थिती बदललेली आहे. सर्व पॅटर्न बदललेला आहे आणि वेळेमध्ये ही घरे पूर्ण झाली पाहिजे, वेळेमध्ये जी घर पूर्ण करतील त्यांना बक्षीस द्या. तसेच वेळेमध्ये पूर्ण करणार नाही त्यांना दंड लावा असे ही म्हणताना, तसेच घरे घेताना त्यांची गुणवत्ता देखील आपण तपासावी याशिवाय ती गुणवत्ता कायम ठेवली पाहिजे. असे ही स्पष्ट केले.

### ठाणेकरांनी भरभरून प्रेम केल्याने मुख्यमंत्री झालो

ठाण्यात लॉटरी असल्यामुळे मला जास्तीतजास्त आनंद आहे. तुम्ही ठाणेकरांनी मला भरभरून प्रेम केले. त्यामुळेच मी मुख्यमंत्री होऊ शकलो आहे, मी आपल्याला पुन्हा एकदा शुभेच्छा देतो असे ते म्हणाले.

# डॉ. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते धर्मवीर आनंद दिघे स्वयंरोजगार योजनेतंर्गत लाभार्थी महिलांना शिवणयंत्र व घरघंटीचे वाटप

**ठाणे :** महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा किंबहुना त्यांना आत्म निर्भर बनविण्याच्या उद्देशाने ठाणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाअंतर्गत धर्मवीर आनंद दिघे स्वयंरोजगार योजनेतंर्गत कळवा, मुंब्रा, दिवा विभागातील एकूण २७८७ पात्र महिलांना शिवणयंत्र व घरघंटीचे प्रातिनिधीक स्वरुपातील वाटप मंगळवारी (२० फेब्रुवारी) खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.




खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या विशेष प्रयत्नाने व महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनखाली सुरू करण्यात आलेल्या धर्मवीर आनंद दिघे स्वयंरोजगार यंत्रसामुग्री वाटप योजनेचा कार्यक्रम खारेगांव नाका येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे क्रीडांगण येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासह माजी महापौर नरेश म्हस्के, मिनाक्षी शिंदे, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त वर्षा दिक्षीत, माजी स्थायी समिती सभापती गोपाळ लांडगे, माजी उपमहापौर रमाकांत मढवी, अशोक भोईर, माजी नगरसेवक उमेश पाटील, राजेंद्र साप्ते, राजन किणे, दर्शना म्हात्रे, मंगल कळंबे, पूजा करसुळे, जितेंद्र पाटील, अमर पाटील, अनिता किणे, दिपाली भगत, अनिता गौरी, प्रियांका पाटील, विजया लासे, लता पाटील महिला व बालकल्याण अधिकारी दयानंद गुंडप, सहाय्यक आयुक्त सचिन बोरसे तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

महिलांना स्वयंरोजगारास चालना मिळणे, महिलांचे जीवनमान सुधारणे व त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होणे, महिलांना रोजगार उपलब्ध करुन त्यांना आत्मनिर्भर बनविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी नमूद केले. सदरची योजना ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई महापालिकेत सुरू केली, त्याच धर्तीवर ठाण्यातील महिलांनाही याचा लाभ व्हावा यासाठी ही योजना ठाणे महापालिकेच्या माध्यमातून सुरू करण्यात आली.

शेतकऱ्यांसाठी योजना, महिलांना एसटीमध्ये ५० टक्के सवलत, ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास तसेच विविध योजना आणण्याचे काम राज्यशासनाने केले असून त्याचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहनही खासदार श्रीकांत शिंदे यांनी केले. महिलांनी घरी राहून शिलाई मशीन तसेच घरघंटीच्या माध्यमातून त्यांचा व्यवसाय या योजनेच्या माध्यमातून करता येणार आहे. आज पहिल्या टप्प्यात कळवा, मुंब्रा, दिवा या विभागातील पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळणार असून ठाणे शहरातील महिलांना लवकरच याचे वाटप केले जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २६ फेब्रुवारी २०२४


# मराठा समाजाच्या ‘रास्ता रोको’ आंदोलनास ठाण्यात अटकाव



## आंदोलनकर्त्यांना घेतले ताब्यात

**ठाणे :** राज्य सरकारने १० टक्के मराठा आरक्षण दिले मात्र कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी काढलेल्या परिपत्रकातील सगेसोयरे या शब्दाची अंमलबजावणी न केल्याने मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन सुरूच ठेवले आहे. त्यांच्या आदेशावरून राज्यभरात रास्ता रोको आंदोलन सुरू करण्यात आले आहे. ठाण्यातील मराठा कार्यकर्त्यांनी वर्तकनगर, कॅडबरी चौक, यासह चार ठिकाणी आंदोलन केले. बारावीची परिक्षा लक्षात घेऊन प्रातिनिधिक स्वरूपात घोषणबाजी आणि परीपत्रकाची अंमलबजावणी करण्याची मागणी या आंदोलनात करण्यात आली. रास्ता रोको करण्यापूर्वी पोलिसांनी कार्यकर्त्यांना ताब्यात घेऊन रास्ता रोको आंदोलन करण्यास अटकाव करीत आंदोलनकर्त्यांना अटक केली.

रमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म राठा समाजाला आरक्षण दिले आणि त्याचा मोठा प्रश्न मार्गी लागला. या निर्णयाचे ठाणेकरांनी स्वागत केले. त्याचवेळी ओबीसी मधून मराठ्यांना हक्काचे टिकणारे आरक्षण मिळावे, याकरिता मनोज जरांगे पाटील यांनी राज्यभरात आंदोलन केली आहेत. आजही त्याचे उपोषण सुरू आहे. हे आंदोलन थांबविण्यासाठी राज्य सरकारने परिपत्रक काढले आणि कुणबी प्रमाणपत्र सापडले आहेत, त्यांच्या सगेसोयरे यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्याची घोषणा केली. मात्र त्या परिपत्रकाची अंम लबजावणी राज्य सरकारने केली नाही. सहा लाख हरकती आल्याने त्यांचा अभ्यास करून निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका मुख्यमंत्री शिंदे विधिमंडळात घेतली आणि पुन्हा एकदा मराठा आरक्षणाचा लढा सुरू झाला आहे. त्यानुसार आज राज्य भरात रास्ता रोको करण्यात आले. यामध्ये आंदोलक दत्ता चव्हाण, डॉ. पांडुरंग भोसले, कृष्णा पाटील, दिनेश पवार, निखिल जाधव, सागर भोसले, प्रवीण कदम, सूरज कोकाटे, विश्वास पाटील, रमेश चौधरी, शरद जगदाळे, तानाजी पोळ यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना अटक केली.

# वसई-भाईंदर रो-रो फेरीबोट सेवा तूर्तास प्रायोगिक तत्त्वावर

## औपचारिक शासकीय लोकार्पण सोहळा अद्याप बाकीच

**ठाणे:** वसई आणि भाईंदर ही शहरे एकमेकांना जलमार्गाने जोडणाच्या दृष्टीने, महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत मे. सुवर्णदुर्ग शिपींग अँड मरीन सर्व्हिसेस प्रा.लि. या ऑपरेटर संस्थेद्वारे २० फेब्रुवारी २०२४ पासून सुरु करण्यात आलेली वसई-भाईंदर रो-रो फेरीबोट सेवा ही तूर्तास फक्त प्रायोगिक तत्त्वावर सुरु करण्यात आलेली आहे. ह्या फेरीबोट सेवेचा कोणताही औपचारिक शासकीय लोकार्पण सोहळा अद्याप झालेला नाही. असे प्रसिद्धी पत्रक महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुंबई, मुख्य बंदर अधिकारी कॅ. प्रवीण एस. खरा यांनी काढले आहे.

या रो-रो सेवेमुळे भाईंदर व वसई किनारपट्टी असा प्रवास वाहने घेऊन करता येणार आहे. मंगळवारी आमदार क्षितीज ठाकुर हे वाहनाने बोटीतून बाहेर पडले. त्यानंतर बोट पुन्हा वसईच्या दिशेने रवाना झाली. तर दुसऱ्या बोटीवर खासदार राजन विचारे यांच्या हस्ते रो रो सेवेचे फीत कापून व श्रीफळ वाढवून लोकार्पण करण्यात आले. परंतु आता हे लोकार्पण औपचारीक नसल्याचे महाराष्ट्र सागरी मंडळाने एका प्रसिध्दी पत्रकारद्वारे स्पष्ट केले आहे. या फेरीबोट सेवेचा कोणताही औपचारीक शासकीय लोकार्पण सोहळा अद्याप झाला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. तूर्तास या फेरीबोटीचे जलम ार्गातून होणारे नौकानयन तसेच बोटीतून प्रवासी व वाहनांची जेट्टीवर चढ उतार सुलभ व सुरक्षितपणे होत आहे किंवा कसे, या बाबींचा महाराष्ट्र सागरी मंडळाकडून अभ्यास करण्यात येत आहे. या सर्व बाबींची एकदा खात्री झाल्यानंतरच, फ ेरीबोट सेवेचा शासकीय लोकार्पण सोहळा करण्यात येणार आहे. त्यामुळे वसई, भाईंदर या रो - रो फेरीबोट सेवेचा शासकीय लोकार्पण सोहळा झाल्याचे सांगण्यात येत असले तरी ते चुकीचे असल्याचे महाराष्ट्र सागरी मंडळाने मुंबई मुख्य बंदर अधिकारी खरा यांनी स्पष्ट केले आहे.




आता डिजिटल स्वरूपात...
दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

दिवा न्यूज
वाचा दर सोमवारी

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २६ फेब्रुवारी २०२४ पान : ८
www.diwanews.com

## कळवा खारेगाव खाडीत आढळला मृतदेह

**ठाणे:** कळवा खारेगाव येथील कळवा खाडीमध्ये एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह नुकताच सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास आढळला. या घटनेमुळे परिसरात चिंतेचे वातावरण पसरले असून या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी कळवा पोलीस व अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेतली. त्या जवानांनी खाडीमध्ये आढळलेला मृतदेह बाहेर काढून कळवा पोलीसांच्या ताब्यात दिला. पोलीस तपास सुरू आहे.



# दिव्याच्या विकासासाठी आता नागरीकांना एक व्हावं लागेल..!

मागील अनेक वर्षे समस्यांचा सामना येथील जनतेला करावा लागत आहे.

सत्ताधाऱ्यांच्या मागे धावून प्रश्न सुटत नाहीत, त्यासाठी आपल्यालाच आवाज उठवावा लागेल.

पाणी प्रश्न,आरोग्य प्रश्न, शिक्षण,अंतर्गत रस्ते विकास, पायाभूत सुविधा यासाठी आपण आवाज उठवूया.. एकजूट दाखवूया!

शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे



**- ज्योती राजकांत पाटील**
**महिला संघटिका,दिवा शहर**